**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**
**कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ**
**श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य**

## पुरस्कारासाठी आवेदनपत्र

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे आणि दानदाते श्री द.ना. उपाख्य बबनराव दादा मेटकर यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगेबाबा सामाजिक कार्य पुरस्कार प्रदान करावयाचा आहे. सदर पुरस्कार श्री संत गाडगेबाबा पुण्यतिथीला दि.२० डिसेंबर २०१४ रोजी प्रदान करण्यात येईल.

**श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार महाराष्ट्र राज्यातील श्री संत गाडगेबाबांच्या विचाराशी बांधील असणारी व्यक्ती किंवा संस्थेला देण्यात येईल. पुरस्कारासाठी एखाद्या व्यक्तीने/संस्थेने स्वतःहून नाव सादर करणे किंवा दुस-या कोण्या एखाद्या व्यक्तीची /संस्थेची पुरस्कारासाठी शिफारस करणे किंवा नाव सूचविणे दोन्ही पध्दतीने अर्ज स्वीकारण्यात येतील. संस्था किंवा व्यक्तीगत आवेदकांनी आवेदन पत्रासोबत आपल्या जीवनाचा सविस्तर आलेख आणि सामाजिक क्षेत्रात कार्य केल्याचा पुरावा पाठविणे आवश्यक आहे.**

श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कारासाठी आवेदकांनी दिनांक ३० सप्टेंबर,२०१४ पूर्वी आवेदनपत्र **“**कुलसचिव, **संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ”,** अमरावती- ४४४६०२ या पत्त्यावर पाठवावीत. आवेदनपत्र पाठवितांना लिफाप्यावर **“ कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार”** हे ठळक अक्षरात लिहावे. विद्यापीठाव्दारे मुद्रांकित आवेदनपत्र पुरविल्या जाणार नसून स्वहस्ताक्षरात/टंकलिखित/संगणकीय आवेदनपत्र स्वीकारण्यात येईल. यापूर्वी अनेक मान्यवर व्यक्तींना हा पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले आहे.

श्री संत गाडगेबाबा सामाजिक कार्य पुरस्काराने यापूर्वी श्री भुजंग महाराज उर्फ चिंधे महाराज, लोहारा, श्री गाडगे महाराज मिशन, मुंबई, ग्रामगीताचार्य श्री रामकृष्णदादा बेलूरकर, वरखेड, योगाचार्य स्व.श्री. रामचंद्र गोपाळराव शेलार उर्फ शेलारमामा, रक्तदान चळवळीतील कार्यकर्ते श्री. महेंद्र भुतडा, अमरावती, श्री. पद्मनाभ हनुमंत पाटील, आंदुर्ले, जि. सिंधुदुर्ग, श्री. प्रभाकरराव अंबादासपंत वैद्य, प्रधान सचिव, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती, श्री. किसनचंद हेमनदास माखीजा, रा. रामपुरी कॅम्प, अमरावती, श्री. महादेवराव गुलाबराव भुईभार, निंभोरा जि. अकोला, श्री. चुन्नीलालजी मोतीलालजी मंत्री, अमरावती यांना सन्मानित केले आहे.

अधिक माहितीसाठी अध्यासन प्रमुख, श्री संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र किंवा जनसंपर्क अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचेशी संपर्क साधावा असे विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव श्री दिनेशकुमार जोशी यांनी कळविले आहे.